# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

**रोजगार मेळावा**

लोकमत पुणे, शनिवार, दि. ७ नोव्हेंबर २०१५ ५

## बेरोजगारांना उद्योजकांनी संधी द्यावी : बुट्टे-पाटील

दावडी : आपल्या भविष्याचे स्वप्न घेऊन या रोजगार मेळाव्यात आलेल्या बेरोजगारांना उद्योजकांनी कामाची संधी द्यावी. त्यांच्या आयुष्यामध्ये आनंदाचे व सुखाचे दिवस निर्माण करावेत, असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांनी केले.

महाराष्ट्र शासनाचे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र पुणे आणि हुतात्मा राजगुरु महाविद्यालय, राजगुरुनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रोजगार मेळावा झाला.

या प्रसंगी जिल्हा कौशल्य विकास केंद्राचे सहायक संचालक राजेंद्र गोडबोले, संस्थेचे संचालक बाळासाहेब सांडभोर, एस. एस. भूतकर, टी. जी. डगले, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. जी. बी. शिंदे, विविध १८ कंपन्यांचे प्रतिनिधी, सर्व प्राध्यापक व सुशिक्षित बेरोजगार उपस्थित होते.

बुट्टे पाटील म्हणाले, अशा मेळाव्यांची समाजाला गरज असून, प्रत्येक गराजवंताला गुणवत्तेच्या आधारावर काम मिळायला हवे. तरुण-तरुणींनीही या मेळाव्यानिमित्ताने आलेल्या संधीचे सोने करायला हवे. कम्युनिटी कॉलेज व शॉर्टटर्म कोर्सच्या माध्यमातून महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांची माहिती सांगितली. तसेच, कंपन्याना कशा प्रकारचे कुशल कामगार हवेत, याबद्दल आम्हाला माहिती दिली तर तसे नियोजन करू, असे आवाहन त्यांनी उद्योजकांना केले. (वा.प्र.)



राजगुरुनगर येथे रोजगार मेळाव्यात मार्गदर्शन करताना खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख